MHLC360000752019

LABOUR COURT

**रमेश हरिचंद बोम्बार्डे -वि- मेसर्स एलोरा पेपर मिल व इतर**
**निशाणी क्र. सी-९ वरील आदेश**

गैरअर्जदार क्र. १ ने प्रस्तुतचा अर्ज हा लेखी जबाब दाखल करून घेण्याची परवानगी मिळावी याकरीता दिला आहे.

२. अर्जदारातर्फे त्याच अर्जावर म्हणणे दाखल करून अर्जास आक्षेप घेतला आहे.

३. दोन्ही विधिज्ञांचा प्रदिर्घ युक्तिवाद ऐकला. तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसते की, अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज हा गैरअर्जदारांविरूद्ध कर्मचारी नुकसान भरपाई कायदा, १९२३ च्या कलम २२ प्रमाणे नुकसान भरपाई मिळण्यासाठी दाखल केला आहे. गैरअर्जदार क्र. १ ने त्याचा लेखी जबाब मुदतीत न दाखल केल्यामुळे त्याच्या विरूध्द दिनांक १५.०२.२०२० रोजी लेखी जबाब नाही असा आदेश निशाणी क्र. १ वर पारित करण्यात आला. तद्नंतर गैरअर्जदार क्र. १ तर्फे प्रस्तुतचा अर्ज हा लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी मिळण्याकरीता देण्यात आला परंतु जो पर्यंत निशाणी क्र. १ वरील लेखी जबाब नाही असा आदेश रद्द होणार नाही तो पर्यंत लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी योग्य व न्याय होणार नाही असे वाटते. म्हणून मी योग्य न्यायदानाच्या दृष्टिकोनातुन खालील आदेश पारित करते.

**आदेश**

अर्ज नामंजुर करण्यात येतो.

Digitally signed by Rohini Suhas Bhosale Narsale
Date: 2020.03.07 10:54:16 +0530

भं डा रा. (सौ. रोहिणी सुहास भोसले—नरसाळे)
दिनांक : ०६.०३.२०२०. आयुक्त,
अंतर्गत : कर्मचारी नुकसान भरपाई कायदा, १९२३
न्यायाधीश : कामगार न्यायालय, भंडारा.

LABOUR COURT